| MHMM260008502018 | प्राप्त दिनांक | : | २८/०५/२०१८. |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २८/०५/२०१८. |
| | निकाल दिनांक | : | १६/१०/२०२३. |
| | कालावधी | : | ०५ वर्षे, ०४ महिने, १८ दिवस. |
| | निशाणी | : | **३८** |

**महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**३६ वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई**
**(न्यायनिर्णय कलम ३५५ फौ. प्र. सं. अन्वये)**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | खटला क्रंमाक | :– | ३३३/पीडब्ल्यू/२०१८. |
| | सी.एन.आर. क्रंमाक | | एमएचएमएम२६०००८५०२०१८. |
| (ब) | अपराध घडल्याची तारीख | :– | १७/०६/२०१७. |
| (क) | फिर्यादीचे नाव (अभियोग पक्ष) | :– | महाराष्ट्र सरकार, द्वारा – वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वांद्रे लोहमार्ग पोलीस ठाणे (गुन्हा नोंद क्र.– १९१/२०१७). |
| (ड) | आरोपीचे नाव | :– | १ आसिफ अब्दुलगणी खान. वय :– २८ वर्षे. काम धंदा :– सेल्समन रा.ठि.:– कांदीवली, मुंबई. |
| (प) | कोणत्या स्वरूपाचा गुन्हा आहे ? | :– | भारतीय दंड विधान कलम ३५४ (ड) (२) प्रमाणे. |
| (फ) | आरोपीला गुन्हा कबुल आहे का ? | :– | आरोपीला गुन्हा कबुल नाही. |
| (ब) | अंतिम आदेश | :– | आरोपीची गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| (भ) | आदेशाचा दिनांक | :– | १६/१०/२०२३. |

अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी विद्वान विधिज्ञ :– श्रीमती शेख नाजिया नुरूल अमीन.
आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ :– श्री. जी.एम. शेख

**न्यायनिर्णय** दि.१६/१०/२०२३.

प्रस्तूतचा खटला हा आरोपी विरूध्द् भारतीय दंड विधान कलम ३५४ (ड)(२) अन्वये दाखल करण्यात आला व चालविण्यात आला आहे.

२. प्रस्तूतच्या खटल्यातील अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे कि, फिर्यादी हिने दि. १७/०६/२०१७ रोजी, अशी फिर्याद दिली कि, दिनांक १७.०६.२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता ती शॉपिंग करिता वांद्रे मुंबई येथे आली होती. तिथे तिची मैत्रिण नामे श्रुती श्रीनिवासन अय्यगार हिला भेटली व शॉपिग करून १४.३० वाजताच्या सुमारास वांद्रे रेल्वे स्टेशन वरील फलाट क्र. ०१ वर आल्या. तिथे त्या भेळ खात गप्पा मारत उभ्या असताना अचानक तिचे उजवे बाजुस पाण्याचे टाकीजवळ उभा असलेला एक प्रवासी इसम त्यांची मोबाईल फोन मध्ये शुटिंग करत असल्याचे तिच्या लक्षात आले. त्याबाबत तिने लागलीच तिची मैत्रिण श्रुती हिस सांगितले व त्यांनी लागलीच दोघींनी मिळून त्याचेकडे जावून त्याचा मोबाईल फोन मागितला असता तो त्याने दाखविण्यास, देण्यास नकार देवून तेथून पळून जावू लागल्याने त्यास त्यांनी पकडले. त्यादरम्यान तेथे फलाटावरील महिला पोलिस आलेने त्यांच्या मदतीने नमुद इसमास पकडले व त्याचे जवळील मोबाईल फोन त्यांच्या ताब्यात घेवून त्यास वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार शाखेत पो.हवा. चौधरी यांचे समक्ष हजर केले. त्यावेळी तिने त्यांना नमुद हकिकत सांगून वरील नमुद इसमाकडून ताब्यात घेतलेला मोबाईल फोन त्यांच्यासमक्ष हजर केला. त्यांनी लागलीच दोन पंचांना बोलावून त्यांच्या समक्ष त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव आसिफ अब्दुलगणी खान राहणार कांदीवली असे सांगितले.

त्यानंतर तिने पोलिसांकडे हजर केलेल्या मोबाईल फोन मधील त्यांची केलेली शुटींग दाखवणेस नमुद आरोपीस सांगितले असता त्याने मोबाईल फोनचे पॅटर्न देवून स्क्रिन खोलून त्यामध्ये शुटींग व्हिडीओ मध्ये दोघांची केलेली शुटींग दाखवली. सदर शुटींग मध्ये त्या दोघी दिसून येत होत्या. त्यानंतर सदर मोबाईल फोन पोलिसांनी त्यांच्या व पंचांचे समक्ष जप्त करून ताब्यात घेतला.

३. फिर्यादीने दिलेल्या जबाबावरून वांद्रे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक— १९१/२०१७, भारतीय दंड विधान कलम ३५४(ड)(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे दिसून येते की, त्यानंतर सदरचा गुन्हा तपासाकरीता पोलीस उप. निरीक्षक श्री. तानाजी संभाजी हारळे, वांद्रे लोहमार्ग पोलीस ठाणे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी सदर गुन्हयाचा तपास करून आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. प्रस्तूत खटल्यामध्ये निशाणी क्र. ०३ कडे माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपी विरूध्द भारतीय दंड विधान कलम ३५४(ड)(२) प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपावरून दोषारोप निश्चित करून आरोपीला त्याच्यावर ठेवलेला आरोप वाचुन दाखविला असता व समजावून सांगितला असता त्याने तो नाकारला आहे व कामकाज पुढे चालू ठेवण्याची विनंती केलेली आहे.

५. आरोपी विरूध्दचे सदरचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आलेत व निशाणी क्रमांक ०१ वरील दिंनाक १४.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये

अभियोग पक्षाचा साक्षपुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द आलेला आक्षेपार्ह पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये (नि.क्र.—३७) आरोपीला वाचून दाखविण्यात आला. आरोपीने त्याचे जबाबात संपूर्ण नकारात्मक बचाव घेतलेला असून त्याचे विरूध्द खोटी केस केली असलयाचे सांगितले. आरोपीने स्वत:च्या बचावार्थ स्वत:ला अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराला तपासले नाही. तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा देखील दाखल केलेला नाही.

६. प्रस्तुत खटल्याच्या कामी दोन्ही पक्षांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व या खटल्यातील रेकॉर्डवरील पुरावा पहाता प्रस्तुत खटल्याच्या निकालाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असुन त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि दि. १७/०६/२०१७ रोजी, सुमारे १४.३० वाजता, फिर्यादी वांद्रे रेल्वे स्टेशनवरील फलाट क्र. ०१ असताना, आरोपीने हेतूपुर्वक, त्याच्या मोबाईल फोन मध्ये फिर्यादीचे चित्रीकरण केले आणि तिच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४(ड) (२) नुसारचा गुन्हा केला आहे? | ... नकारार्थी. |

२. आदेश काय? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

७. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासले. ते खालीलप्रमाणे :—

| अनु क्रमाक | साक्षीदारांचे नांव | साक्षीदार क्रमाक | साक्षीदारांची स्थिती | निशाणी क्रमाक |
|---|---|---|---|---|
| १. | फिर्यादी | साक्षीदार.क्र.१ | फिर्यादी | निशाणी.क्र २० |
| २. | सुरेश दगडू वांद्रे | साक्षीदार.क्र.२ | पंच साक्षीदार | निशाणी.क्र २७ |
| ३. | मेघा राजाराम मुळीक | साक्षीदार.क्र.३ | महिला पोलिस साक्षीदार | निशाणी.क्र ३० |
| ४. | नितिन सदाशिव चव्हाण | साक्षीदार.क्र.४ | पोलिस साक्षीदार | निशाणी.क्र ३४ |
| ५. | तानाजी संभाजी हारळे | साक्षीदार.क्र.५ | तपासी अधिकारी | निशाणी.क्र ३६ |

तसेच फिर्याद (नि.क्र.२१), अंगझडती/जप्ती पंचनामा (नि.क्र.२८), सी. सी.टी.व्ही. फुटेज जप्ती पंचनामा (नि. क्र.२९), आरोपीची ठाणे दैनंदिनी व अटक रजिस्टरी नोंद होणेबाबतचा पोलिस अहवाल (नि. क्र.३१) व घटनास्थळ पंचनामा (नि. क्र.३५) हे दस्तऐवज सिध्द केलेले आहेत.

### मुद्दा क्र. १ बाबत :—

८. भा.द.वि कलम ३५४(ड) (२) अंतर्गत आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने खालील बाबी सिध्द करणे गरजेचे ठरते.

***Section 354(D)(2) :- Essential Ingredients***

(I) If a man -

1) follows a woman and contacts or attempts to contact such woman,
2) monitors the use by a woman of the Internet, e-email or any other form of electronic communication.
3) or watches or spies on a person.

(II) to foster personal interaction repeatedly.

*(III)* despite a clear indication of disinterest by such woman.

९. त्याअनुषंगाने अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. फिर्यादीने न्यायालयासमक्ष साक्षपुरावा देतांना असे कथन केले आहे की, दिंनाक १७.०६.२०१७ रोजी ती तिच्या मैत्रीणी सोबत शॉपींग करीता वांद्रे येथे गेली होती. त्यांनतर त्या शॉपींग करून साधारण ०१.३० ते २.०० वाजता वांद्रे रेल्वे स्टेशनवर फलाट क्र ०१ वर आल्या वांद्रे रेल्वे स्टेशनच्या बाजुला असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ एक मुलगा उभा राहून तिचा व तिच्या मैत्रीणीचा व्हिडीओ बनवत असल्याचा तिला संशय आला. त्यांनतर त्यांनी त्याच्याकडे बघितले असता त्याने मोबाईल फोन खाली घेतला. त्यांनतर त्या लगेच त्याच्याकडे गेल्या. त्याला त्यांनी “तु फोन दाखव” असे म्हटले असता त्याने त्याचा मोबाईल फोन दाखविण्यास नकार दिला. त्यांनतर फलाटवर कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिस शिपाई त्याठिकाणी आल्या. सदर मुलाचा मोबाईल तिने तिच्याकडे घेतला होता. त्यांनतर सदर महिला शिपाई त्यांना घेऊन वांद्रे रेल्वे स्टेशनवरील पोलिस चौकी मध्ये गेल्या. त्यांनतर पोलिसांनी तिला काय झाले असे विचारून लागलीच दोन पंचाना बोलावून घेतले. सदर मुलाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आसीफ अब्दुल

गणी खान असे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी सदर मुलाचा तिच्याकडे असलेला मोबाईल घेतला व त्याला मोबाईल उघडून व्हिडीओ दाखविण्यास सांगितले. त्यांनतर सदर मुलाने सर्वप्रथम गॅलरी मध्ये जाऊन पासवर्ड टाकून मोबाईल उघडला व व्हिडीओ दाखविला. त्यांनतर पोलिसांनी सदर व्हिडीओ क्रॉस व्हेरीफाय केला. सदर व्हिडीओ पाहिल्यानंतर पोलिसांनी कायदेशीर रित्या तिची तक्रार नोंदवून घेतली.

१०. तिच्या उलटतपासात असे आले आहे की, दिंनाक १७.०६. २०१७ रोजी त्या दुपारी १.३० वाजता पासून संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत पोलिस स्टेशनमध्ये होत्या. संपुर्ण कारवाई पोलिस स्टेशनमध्येच बसून केली होती. तिने व्हिडीओ बघितला होता. सदर व्हिडीओ मध्ये तिच्या व्यतिरिक्त इतर प्रवाशी देखील दिसत होते. आरोपी हा त्याच्या मोबाईल मध्ये बघत होता, त्यांच्याकडे बघत नव्हता. आर्टीकल ए वर असलेल्या मोबाईल सारखे मोबाईल फोन बाजारा मध्ये उपल्ब्ध आहेत

११. साक्षीदार क्रमांक ०२ सुरेश दगडू वांद्रे पंच त्यांच्या साक्षीपुराव्यात असे सांगतात की, दिंनाक १७.०६.२०१७ रोजी त्याला पोलिसांनी वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन येथे पंचनाम्याकामी बोलावले होते. त्याप्रमाणे तो पोलिस स्टेशनला गेला होता. त्या ठिकाणी ते दोघे पंच, दोन महिला प्रवाशी, एक आरोपी व काही पोलिस होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना असे सांगितले की, "आरोपी हा सदर महिला प्रवाशांची शुटींग काढत होता. त्यामुळे त्याला पकडले." त्यानंतर पोलिसांनी आरोपीचा मोबाईल फोन घेवून चेक केला असता त्यामध्ये सदर महिला प्रवाशांची शुटींग केली असल्याचे दिसले. त्यानंतर

पोलिसांनी सदरचा मोबाईल फोन जप्त केला व आरोपीला अटक केली. त्यांनतर परत एक दोन दिवसा नंतर पोलिसांनी त्याला पोलिस स्टेशनला बोलावले होते. त्यावेळी पोलिसांनी असे सांगितले होते की, “फलाटावर जावून सी.सी.टी.व्ही. फुटेज बघायचे आहे.” त्याप्रमाणे ते दोघे पंच, पोलिस व एक साहेब आर.पी.एफ.च्या ऑफिसमध्ये गेले. त्याप्रमाणे त्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. फुटेज बघितले असता ७ नंबरच्या कॅमेरामध्ये आरोपी दिसत होता. त्यानंतर सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज पेन ड्राईव्ह मध्ये घेतले व त्यानंतर त्याची सी.डी तयार केली. त्यानंतर पंचनामा करून सी.डी जप्त केली.

१२. त्यांच्या उलट तपासात असे आले आहे की, त्याचे शिक्षण ७ वी पर्यत झाले आहे. वांद्रे स्टेशनच्या बाहेर त्याचे चहाचे दुकान आहे. त्याची काही पोलिसांशी चांगली ओळख आहे. जेव्हा जेव्हा पोलिस त्याला बोलवितात तेव्हा तेव्हा तो पंचनाम्याकामी जातो. त्यांना असे सुचविण्यात आले होते की, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी पोलिसांनी त्यांना बोलावून त्यांची पेपरवर सही घेतली होती ही बाब त्यांनी नाकारली व सांगितले की, पंचनाम्यावर सही घेतली होती व पंचनामा वाचून दाखविला होता. तो पोलिस स्टेशनमध्ये गेल्यानंतर तेथे तीन चार पोलिस होते. त्यांनी पोलिसांची झडती घेतली नव्हती. त्यांनी आरोपीची देखील झडती घेतली नव्हती. आरोपीच्या अंगझडती मध्ये मोबाईल फोन, तिकिट व काही कागदपत्र मिळून आले होते.

१३. साक्षीदार क्र ०३ श्रीमती मेघा राजाराम मुळीक महिला पोलिस साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, सन २०१७ मध्ये त्या वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन येथे महिला पो. शिपाई म्हणून

कार्यरत होत्या. दिंनाक १७.०६.२०१७ रोजी त्यांची दिवसपाळीची सकाळी ८.०० ते रात्री २०.०० वाजेपर्यत वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन येथे वायरलेस कामी डयुटी होती. त्या डयुटी वर असताना एक इसम आला व त्याने असे सांगितले की, “वांद्रे रेल्वे स्टेशन येथील फलाट क्र ०१ वर दोन महिला प्रवाशांची दुस—या एका प्रवाशा सोबत झटापट चालू आहे.” त्यानंतर त्यांनी ठाणे अंमलदार यांना सांगितले असता त्यांनी त्यांना “जावून बघा” असे सांगितले. त्यानंतर त्या वांद्रे रेल्वे स्टेशन फलाट क्र ०१ वर गेल्या. त्याठिकाणी दोन महिला प्रवाशांची दुस—या एका प्रवाशा सोबत बाचाबाची चालू होती. त्यानंतर त्यांनी सदर महिला प्रवाशांना काय झाले म्हणून विचारले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, “सदर इसम मोबाईल फोन मध्ये आमची शुटींग काढत आहे.” त्यानंतर त्यांनी सदर इसमास त्याचा मोबाईल फोन दाखविण्यास सांगितले असता त्याने नकार दिला व तो पळून जात असताना सदर दोन महिला प्रवाशी व त्यांनी स्वत: त्याला पकडले. त्यानंतर सदर दोन महिला प्रवाशी व पकडलेला इसम यांना मोबाईल फोन सह पोलिस स्टेशनला घेवून आल्या व ठाणे अंमलदार चौधरी यांच्या समक्ष हजर केले. त्याठिकाणी ठाणे अंमलदार यांनी सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले. दोन पंचांसमक्ष त्याच्याकडील मोबाईल फोन जप्त केला. त्याप्रमाणे त्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक वांद्रे रेल्वे स्टेशन यांना अहवाल दिला होता. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, मोबाईल फोन मधील व्हिडीओ मध्ये दोन्ही महिला प्रवाशांचे फोटो होते तसेच बाजूला एक दोन प्रवासी उभे असल्याचे दिसत होते.

१४. साक्षीदार क्र ०४ नितीन सदाशिव चव्हाण पोलिस

साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, गु. र. क्र. १९१/२०१७ मध्ये घटनास्थळ पंचनामा करण्याकामी वरिष्ठांचे त्यांना तोंडी आदेश होते. त्यानंतर ते फिर्यादीला घेवून बांद्रा रेल्वे स्टेशन फलाट कं १ जवळील स्टेशन मास्तर ऑफिससमोरील पाण्याच्या टाकीजवळ घेवून गेले. त्यानंतर त्याठिकाणी दोन पंचांना बोलावून घेवून त्यांना फिर्यादीची ओळख करुन दिली. त्यानंतर फिर्यादीने गुन्हयाची थोडक्यात हकिकत सांगितली. घटनास्थळाच्या पूर्व बाजूला डाउन दिशेचा रेल्वे ट्रॅक, पश्चिमेला स्टेशन मास्तर ऑफिस, उत्तरेला पाण्याची टाकी आणि दक्षिणेला पब्लिक ब्रीज आहे. त्यानंतर सदरचा पंचनामा लॅपटॉपवर बनवून पोलीस स्टेशनला येवून त्याची प्रिंट काढून त्यावर पंचांच्या सहया घेतल्या व त्यांनी सुध्दा सही केली.

१५. साक्षीदार क्र. ०५ तानाजी संभाजी हारळे तपासिक अंमलदार यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, गु. र. क्र. १९१/२०१७ मध्ये सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासून त्याची सीडी तयार करण्याबाबत वरिष्ठांचे त्यांना लेखी आदेश होते. त्याप्रमाणे त्यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता त्यामध्ये आरोपी व फिर्यादी दिसतात. त्यानंतर सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज सीडी मध्ये संकलित करुन ती दोषारोप पत्रासोबत दाखल केली. त्यानंतर तपास पूर्ण करुन आवश्यक ते कागदपत्र तयार करुन दोषारोपपत्र दाखल केले. सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्त केल्याबाबतचा जप्ती पंचनामा तयार केला होता.

१६. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, पंचनाम्यावरील पंच साक्षीदार त्यांच्या ओळखीचे आहेत. ब–याच केसेमध्ये सदरचे पंच साक्षीदार आहेत. पंचांचे मोबाईल नंबर त्यांच्याकडे असतात व गरज

पडल्यास ते त्यांना बोलावून घेतो परंतु सदरची बाब त्यांनी नाकारली. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत. सी.सी.टी.व्ही. फुटेजचे कलम ६५ बी चे प्रमाणपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल नाही.

१७. उपरोक्त साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादीने तिच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपी हा तिचा व तिच्या मैत्रिणीचा व्हिडीओ बनवित असल्याचा तिला संशय आला. त्यानंतर त्या लगेच आरोपीकडे गेल्या व त्याला फोन दाखव असे म्हटले असता त्याने मोबाईल फोन दाखविण्यास नकार दिला. आरोपीचा मोबाईल फोन तिने तिच्याकडे घेतला होता. परंतु फिर्यादीच्या उलटतपासात असे आले आहे की, सदर व्हिडीओ मध्ये तिच्या व्यतिरिक्त इतर प्रवाशी देखील दिसतात. आरोपी हा त्याच्या मोबाईल फोन मध्ये बघत होता, त्यांच्याकडे बघत नव्हता. त्याचप्रमाणे आर्टीकल ए वर असलेल्या मोबाईल फोन सारखे फोन बाजारामध्ये उपल्ब्ध आहेत. फिर्यादीच्या सदरच्या साक्षीपुराव्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे नमुद घटनेच्यावेळी आरोपी तिच्याकडे बघत नव्हता. उलटपक्षी तो त्याच्या मोबाईल फोन मध्ये बघत होता. त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे पटलावर, अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने त्याच्या मोबाईल फोन मध्ये घेतलेला व्हिडीओ प्रत्यक्ष न्यायालयासमक्ष सादर केलेला नाही. त्यामुळे फिर्यादीचा साक्षपुरावा हा निश्चितच तोकडया स्वरूपाचा ठरतो. त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे सी.सी.टी.व्ही. फुटेज देखील पटलावर आणलेले नाहीत.

१८. पंच साक्षीदार असे सांगतो की, पोलिसांनी त्याच्या समक्ष

आरोपीचा मोबाईल फोन घेवून चेक केला असता त्यामध्ये सदर महिला प्रवाशांची शुटींग केली असल्याचे दिसते. त्यानंतर पोलिसांनी सदरचा मोबाईल फोन जप्त केला व आरोपीला अटक केली. तो पुढे असे सांगतो की, सी.सी.टी.व्ही. फुटेज बघितले असता ०७ नंबरच्या कॅमेरामध्ये आरोपी दिसत होता. तो उलटतपासात असे कबुल करतो की, त्यांनी पोलिसांची तसेच आरोपीची झडती घेतली नव्हती. तो असे देखील कबुल करतो की, आरोपीच्या अंगझडती मध्ये मोबाईल फोन, तिकिट व काही कागदपत्र मिळून आले होते. जेव्हा की, फिर्यादी असे सांगते की, आरोपीचा मोबाईल फोन तिने तिच्याकडे घेतला होता. त्यामुळे फिर्यादीचा व सदर पंच साक्षीदाराचा साक्षीपुरावा हा एकमेकांशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही.

१९. साक्षीदार क्र ०३ हया असे सांगतात की, त्या घटनास्थळावर गेल्या असता त्या ठिकाणी फिर्यादी, तिची मैत्रीण व आरोपीची बाचाबाची चालू होती. त्यावेळी फिर्यादीने असे सांगितले की, आरोपी हा मोबाईल फोन मध्ये त्यांची शुटींग काढत आहे. आरोपीने मोबाईल फोन दाखविण्यास नकार दिला असता त्या सदर दोन महिला प्रवाशी व आरोपीला मोबाईल फोन सह पोलिस स्टेशनला घेवून आल्या व ठाणे अंमलदार यांच्या समक्ष हजर केले. त्या ठिकाणी दोन पंचांसमक्ष आरोपीकडील मोबाईल फोन जप्त केला. जेव्हा की त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, अंगझडतीच्या वेळेस आरोपीच्या ताब्यात मोबाईल फोन मिळून आला नव्हता. सदरहू साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात व उलटतपासात केलेल्या वेगवेगळया कथनामुळे त्यांचा साक्षीपुरावा देखील विश्वासार्ह ठरत नाही.

२०. साक्षीदार क्र ०४ असे सांगतात की, घटनास्थळाचा पंचनामा करून लॅपटॉपवर बनवून पोलिस स्टेशन येवून त्याची प्रिंट काढून त्यावर पंचांच्या सहया घेतल्या. तपासिक अंमलदार असे सांगतात की, सी.सी. टी.व्ही. फुटेज तपासले असता त्यामध्ये आरोपी व फिर्यादी दिसतात. त्यानंतर सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज सी.डी मध्ये संकलित करून दोषारोपपत्रासोबत दाखल केले व सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्त केल्या बाबतचा जप्ती पंचनामा तयार केला होता. परंतु ते त्यांच्या उलटतपासात असे सांगतात की, सी.सी.टी.व्ही. फुटेजचे कलम ६५ (ब) चे प्रमाणपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल नाही. वर चर्चित केल्याप्रमाणे अभियोगपक्षातर्फे सी.सी.टी.व्ही. फुटेज देखील न्यायालयासमक्ष सिध्द करण्यात आलेले नाहीत.

२१. उपरोक्त साक्षीदारांच्या साक्षपुराव्यांचे अवलोकन केले असता, अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द केले नाहीत हे स्पष्ट होते. परिणामी अभियोगपक्षाच्या कथनाबददल संशय निर्माण होतो व संशयाचा फायदा हा नेहमीच आरोपीला देणे अभिप्रेत ठरते. म्हणून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्र.२ ला अनुसरून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी आसिफ अब्दुलगणी खान यास भारतीय दंड संहिता कलम ३५४(ड)(२) अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम ₹१५,०००/– (पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन दयावा, ज्याची वैधता अपीलाच्या कालावधीपर्यंत राहिल.

३. जप्त मुददेमाल म्हणजेच ओप्पो कंपनीचा सिल्व्हर रंगाचा मोबाईल फोन हा जर चालु स्थितीत असेल तर आव्हानाच्या कालावधीनंतर त्याचा जाहीर लिलाव करण्यात यावा व लिलावाची रक्कम सरकार जमा करण्यात यावी व जर सदरचा मोबाईल फोन हा चालु स्थितीत नसेल तर आव्हानाच्या कालावधीनंतर नियामाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

४. सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

**सही/—**
(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी,
दि.:— १६/१०/२०२३. ३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई.
आलम.

श्रुतलेखन दिनांक. :— १६/१०/२०२३
प्रतिलेखन दिनांक. :— १६/१०/२०२३
स्वाक्षरी दिनांक. :— १६/१०/२०२३
आलम.